# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

**MID-TERM EXAMINATION 2024-25**

**MARATHI**

Class : VIII
Date : 14.09.2024
Admission No.:

Duration : **3** Hrs
Max. Marks : **80**
Roll No.:

---

**सामान्य निर्देश –**

(1) सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
(2) खंड – क ,ख, ग, घ नमूद करावेत.
(3) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## [ खंड क वाचन कौशल्य ]

**प्रश्न 1 अपठित गदयांश –** **(5)**

आषाढी एकादशी आली.देहू गावातील वारकरी मंडळी टाळ,मृदंग वगैरे घेऊन देवळाकडे जमली. तुकोबा मात्र अजून आले नव्हते. ज्याची वाट पाहून मंडळी कंटाळली. शेवटी कोणीतरी म्हणाले ,तुकोबा अजून आले नाहीत. वेळ तर होत आली. पण त्याच्याशिवाय जायचं तरी कसं ? त्यांच्या घरी जाऊन बघू या. दुसरा म्हणाला सर्वांनाच ते पटलं सगळे वारकरी तुकोबांच्या घरी आले. तुकोबा ओसरीवर पांडुरंग–पांडुरंग म्हणत बसले होते. त्यांना बसलेले बघून एका वारक–याने विचारले ,तुकोबा अजून तुमची तयारी झाली नाही ? कसली तयारी ? तुकोबांनी विचारले ?

(1) वारकरी कोठे राहत होते ?
अ आळंदी ब देहू क निगडी

(2) वारकरी कोठे जमले होते ?
अ घराजकडे ब दुकानाकडे क देवळाकडे

(3) कोण अजून आले नव्हते ?
अ तुकोबा ब कानोबा क राघोबा

(4) तुकाराम कोठे बसले होते ?
अ अंगणात ब घरात क ओसरीवर

(5) तुकाराम काय म्हणत बसले होते ?
अ पांडुरंग ब राम क कृष्ण

**प्रश्न 2 पठित गदयांश –** **(5)**

एकदा एका शाळेत एक शिक्षणाधिकारी गेले होते. ते एका वर्गात गेले.विदयार्थ्यांची गणित विषयाची प्रगती बघण्यासाठी त्यांनी विदयार्थ्यांना एक उदाहरण सोडवायला दिले एका वर्गात जर शंभर मुले आहेत.जर पहिल्या मुलाला शंभर रुपये दिले. दुस–याला नव्वानवे रुपये ,तिस–याला अठ्यानवे रुपये याप्रमाणे शेवटच्याला एक रुपया अशी बक्षिसे दयावयाची ठरवली,तर एकूण किती रुपये लागतील ? मुले विचार करू लागली त्यांनी आपआपल्या पाटीवर आकडेमोड सुरू केली.शेवटच्या बाकावर बसलेल्या एका मुलाकडे अधिका–याचे लक्ष गेले. काळासावळा असा तो मुलगा हात दुमडून बसला होता.इतर मुले गणित सोडविण्याचा प्रयत्न करत होती. मात्र तो मुलगा स्वस्थ बसला होता. हे पाहून त्यांना नवल वाटले.

(क) शाळेत कोण गेले होते ?

अ आई　　ब बाबा　　क शिक्षणाधिकारी

(ख) कोण स्वस्थ बसला होता ?

अ मुलगा　　ब मुलगी　　क काका

(ग) वर्गात किती मुले आहेत ?

अ वीस　　ब पन्नास　　क शंभर

(घ) शेवटच्या मुलाला किती रुपये दयायचे ठरवले ?

अ पाच　　ब एक　　क दहा

(ड.) मुलाचा रंग कसा होता ?

अ काळासावळा　　ब गोरा　　क काळा

## खंड ख व्याकरण

**प्रश्न 3 विरुधार्थी शब्द –** ( opposites ) **(2)**

1 आवड x　　( नावड / आवडती / नाखूश )

2 जुनी x　　( नवी / जुनाट / ओळख )

**प्रश्न 4 लिंग बदला –** ( change the gender ) **(2)**

1 महाराज　　( राजा / बादशहा / महाराणी )

2 सखा　　( मित्र / सखी / मैत्रीण )

**प्रश्न 5 वचन बदला –** (write the plural noun ) **(2)**

1 पुस्तक　　( वही / पुस्तको / पुस्तके)

2 पान　　( रान / पाने / पत्ते )

**प्रश्न 6 समानार्थी शब्द लिहा–** **(2)**

1 जंगल =　　( बाग / वन / वारा )

2 युध्द =　　( समर / सैन्य / जनता )

**प्रश्न 7 काळ ओळखा –** **(2)**

1 बाबा गावाला गेले .

2 उदया आई घरी जाणार.

**प्रश्न 8 दार प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2)**

1 दुकान + दार =

2 फौज + दार =

**प्रश्न 9 अशुध्द शब्द शुध्द करून लिहा –** **(2)**

1 पुलीस

2 मतोश्री

**प्रश्न 10 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2)**

1 आम्ही सर्व खेळ खेळत आहोत.

2 तू मला पुस्तक दे.

## खंड ग साहित्य

**प्रश्न 11 पठित गदयांश –** **(5)**

म्हातारा वाचीत होता. त्याच्या आरामखुर्चीस लागूनच एक नऊ–दहा वर्षांचा तरतरीत नाकाचा पंजाबी पोरगा बसला होता. म्हातारा मधून मधून त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत होता. मोठया मायेने त्याच्याशी बोलत होता. म्हाता–याने खाकी हाफ पॅट ,खाकी शर्ट ,गळयात कसला तरी गंडा घातला होता. मिश्या करडया ,मटनचॉपच्या आकाराचे आखूड पांढरे शुभ्र केस, छाती उघडी होती. डोळे त्या दिवशीच्या समुद्रासारखे शांत ,प्रसन्न व निळे होते.

प्रश्न

1 वरील गदयांश कोणत्या पाठातून घेतला आहे ?

2 म्हाता–याचे डोळे कसे होते ?

3 पंजाबी मुलगा किती वर्षांचा होता ?

4 शांत या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा ?

5 म्हातारा काय करीत होता ?

**प्रश्न 12 पठित पदयांश –** **(5)**

दळिता कांडिता । तुज गाईन अनंता ।।1।।
न विसंबे क्षणभरी । तुझे नाम गा मुरारी ।।2।।
नित्य हाची कारभार। मुखीं हरि निरंतर ।।3।।
मायबाप बंधुबहिणी । तू बा सखा चक्रपाणी ।।4।।
लक्ष लागले चरणाशी। म्हणे नामयाची दासी

प्रश्न

1 वरील अभंग कोणी लिहिला आहे ?

2 मुखीं निरंतर कोण आहे ?

3 कवयित्री कोणाची दासी आहे ?

4 लक्ष या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा ?

5 कवयित्री कोणते काम करीत आहे?

**प्रश्न 13 जोडया लावा –** **(4)**

1 रांजणगाव –मयुरेश्वर

2 ओझर – बल्लाळेश्वर

3 पाली – विघ्नेश्वर

4 मोरगाव – महागणपती

**प्रश्न 14 रिकाम्या जागा भरा –** **(4)**

1 लहान मुलांना ––––– मारू लागले.

2 मी ––––– झालो.

3 बघु ––––– या मुंग्यांचा.

4 या शांत ––––– वादळ उठेल.

**प्रश्न 15 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2)**

1 परंतु तशी परवानगी आहे का?

2 हा छोकरा कोण ?

**प्रश्न 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा –** **(7x2=14)**

1 गणपतीची आराधना केल्यास कोणते फळ मिळते ?

2 अहिल्याबाई होळकरांनी कोणत्या मंदिराचा जीर्णोध्दार केला ?

3 गोप्या गवतात का लपून बसला ?

4 गोप्याच्या डोळयात अश्रू का दाटूल आले ?

5 बिनभिंतीची शाळा कशास म्हटले आहे ?

6 कर्नलने आपल्याबद्दल लेखकाला काय सांगितले ?

7 लेंखक कर्नलशी भेटणे का टाळत होते ?

8 जनाबाईंचे लक्ष कोणाच्या चरणापाशी लागले आहे ?

9 जनाबाईंनी चक्रपाणी म्हणून कोणाला संबोधले आहे ?

**प्रश्न 17 आपल्या मनपसंद चॉकलेटसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(5)**


1 निसर्ग आपला गुरू

2 माझा आवडता खेळ

3 दसरा

**प्रश्न 19 स्वपरिचय लिहा :–** ( my self in marathi ) **(5)**

**प्रश्न 20 :–चित्र वर्णन –** **(5)**



—————————————— **समाप्त** ——————————————